# कृषी पदवीधरांनो, कृषी उद्योजक व्हा...

डॉ. अनिल आडे
संचालक, आत्मनिर्भर बळीराजा कृषी व्यवसाय प्रा. लि., पुणे



कृषी उद्योजक होण्यासाठी बिझनेस, उद्योग रक्तात असावा लागतो, हे चुकीचे आहे. पिढ्यान् पिढ्यांच्या कृषी उद्योगांपेक्षाही अनेक नवीन कृषी उद्योजकांनी खूप मोठी कामगिरी केली आहे. कृषी उद्योजकता ही मानसिकता आहे. त्यामुळे कृषी उद्योजक होण्यासाठी सर्वप्रथम आपण आपली मानसिकता तशी घडवली पाहिजे. कृषी पदवीधारकांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या पाठीमागे न लागता स्वत:चा कृषी उद्योग/व्यवसाय सुरू करावा. शेतकऱ्यांचा फायदा डोळ्यांसमोर ठेवून काम केल्यास कृषी उद्योगात प्रचंड संधी आहेत. कोणताही कृषी उद्योग/व्यवसाय करताना गुणवत्तेशी तडजोड करता कामा नये.

### (अ) स्वत:ची मानसिकता बदला....

मानसिकतेच्या दोन प्रकारच्या धारणा असतात, एक सकारात्मक व दुसरी नकारात्मक. आपल्यावर लहानपणापासून नकारात्मक धारणेचा पगडा असतो. लहानपणापासून १८ वर्षांपर्यंत हजारो वेळा "तुला हे जमणार नाही", असे ऐकवले जाते. नकारात्मकतेसह सुरवात ही उद्योजकतेसाठी धोक्याची घंटा असते. उद्योग माझ्यासाठी नाही, अशी धारणा असणारा कधीच उद्योजक होऊ शकणार नाही. म्हणून धारणा सकारात्मकच हवी. स्वत:वरील विश्वास हा व्यवसायाचा पाया असतो. बहुतेक तरुण मुलांची व्यवसायाची कल्पना फारच छोटी, त्रोटक असते. त्यात दूरदृष्टी नसते. स्वप्नं पाहायचीच तर ती मोठीच पाहिली पाहिजेत. कारण प्रेरणा ही फक्त मोठ्या गोष्टीतून येते. शाळा, कृषी महाविद्यालय सोडले की आपण शिकणे थांबवतो. खरे तर तेथून पुढे शिकण्याची खरी सुरवात होते. प्रत्येक अनुभव स्वत: घेण्यापेक्षा इतरांच्या अनुभवातून शिकलो तर वेगाने प्रगती करता येते. यासाठी पुस्तके, भाषणे, चर्चासत्रे, प्रशिक्षण अतिशय महत्त्वाची असतात. उद्योजकाकडे नेतृत्व अंगभूत असावे लागत नाही. महात्मा गांधी, बिल गेट्स, नारायणमूर्ती, जमशेदजी टाटा, धीरूभाई अंबानी, आनंद महिंद्रा ई. या प्रत्येकाने स्वत:तील न्यूनगंडावर मात करून नेतृत्व घडवले. आयुष्यात प्रत्येक गोष्ट जाणीवपूर्वक करायला हवी. जाणीवपूर्वक जगणे हा यशाचा पहिला मार्ग आहे. एकमेकांच्या सहयोगातून निर्माण केले तर अधिक लाभ मिळतो. कृषी क्षेत्रात यापुढील काळात सहयोगातून क्रांती होणार आहे. त्यामुळे ही वृत्ती निर्माण करावी व त्यादृष्टीने त्याकडे बघावे. आपण बुध्यांकाला अवास्तव महत्त्व देतो. उद्योगासाठी तुमचा बुध्यांक नाही तर भावनांक खूप चांगला असावा लागतो. तुमची स्वत:बरोबर व दुसऱ्याबरोबर वागण्याची क्षमता तुमचे यश ठरवते. उद्योजकाच्या अंगी शिस्त हवी. त्याशिवाय कुठलाच उद्योग घडू शकत नाही. वेळ चुकली की सर्व चुकते. उद्योजकाचा एक पाय वर्तमानात व दुसरा भविष्यात असावा लागतो.

### (ब) असा करा प्रकल्प अहवाल....

प्रकल्प अहवाल हा कोणत्याही कृषी उद्योगाचा प्राण असतो. कृषी उद्योगासाठी कर्ज, गुंतवणूक, शासकीय अनुदाने, सवलती हवी असेल तर प्रकल्प अहवाल तयार करणे अत्यावश्यक असते. सुयोग्य प्रकल्प अहवाल हा उद्योजक, बॅंक, वित्तीय संस्था, शासनाची धोरणे, योजनांची उद्दिष्टे, तांत्रिक, आर्थिक बाजू, बाजारपेठ अभ्यास, सामाजिक फायदे या सर्वांचा एकत्रित विचार करून तयार होतो. तुम्ही प्रकल्प वेगळ्या पद्धतीने पाहिला, तुमचे सर्वोत्तम पाऊल टाकले तर बॅंक तुमच्या मागे येईल. प्रकल्पासाठी सल्लागार काळजीपूर्वक निवडावा. संबंधित सल्लागार बॅंकांच्या काळ्या यादीत किंवा गुप्त नकारात्मक यादीत नसल्याची खातरजमा करावी. उद्योग कसा अपेक्षित आहे, तुमची माहिती, शैक्षणिक व तांत्रिक पात्रता, अनुभव, आर्थिक गुंतवणूक, आर्थिक माहिती, क्रेडिट इन्फॉर्मेशन रिपोर्ट व कंपनी क्रेडिट इन्फॉर्मेशन रिपोर्ट याबाबत सविस्तर माहिती असावी. वीजपुरवठा, कच्चा माल व त्याची गुणवत्ता, सल्लागार या तांत्रिक बाबी, बाजारपेठेचा अभ्यास, विक्री कशी होणार, निर्यातीच्या संधी, विविध प्रमाणपत्रे, प्रकल्पाचा एकूण अपेक्षित खर्च व प्रस्तावित अंशदान, कर्ज उभारणी याचाही विचार करावा. कर्जाची दीर्घ मुदत व परतफेड सुरू होण्याआधी दिलेली मुदत लक्षात घेऊन तेवढ्या कालावधीचे संभाव्य ताळेबंद पत्रक तयार करावे. खेळते भांडवल कसे उभारणार, वीज, पाणी, पगार, वेष्टण, प्रसिद्धी, कर्जाच्या परतफेडीचे नियोजन काय आहे. विविध परवाने मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न व सद्य:स्थिती याची माहिती बॅंकेला द्यावी. तुमची क्षमता, प्रकल्पाची क्षमता, कोणते उत्पादन घेणार, किती, उत्पादन प्रक्रिया, आवश्यक यंत्रसामग्री व ती कोठून घ्यावी, तांत्रिक बाजू, व्यापारी दृष्टिकोन, आर्थिक बाजू, परवाने, अभिप्रेत व्यवस्थापन, लागू

असलेले राज्य व केंद्राचे कायदे, मनुष्यबळ कुशल, निमकुशल, विक्री व्यवस्थापन, प्रोत्साहने व अनुदाने, उपलब्ध व्यवसायाभिमुख सेवा लक्षात घेऊन कोणत्याही कृषी व्यवसायाचा प्रकल्प अहवाल तयार करावे.

### (क) भांडवल (फायनान्स) महत्त्वाचा....

कोणत्याही कृषी उद्योगासाठी भांडवल अत्यंत महत्त्वाचे असते. व्यवसाय करताना नफा, तोटा, व्यवसायाची वाढ, उलाढाल, डिमांड, शासकीय धोरण, किंमत या गोष्टी माहिती हव्यात. प्रॉफिट व मार्जिनऐवजी किती पैसे गुंतवले व किती परतावा मिळाला, याकडे सर्वाधिक लक्ष हवे. रोख उलाढाल वृत्तांत, नफा तोटा वृत्तांत व ताळेबंद तयार करणे व अद्ययावत ठेवणे महत्त्वाचे असते. अनेकदा नफा कागदोपत्री असतो, पैसे हाती आलेले नसतात. व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी "कॅश फ्लो' म्हणजेच तुमच्या हाती नक्की किती रक्कम राहते, हे महत्त्वाचे असते. कॅश फ्लो हा व्यवसायाच्या टिकाऊपणाचा निर्देशांक असतो. कॅश फ्लो व्यवस्थित नसल्याने ९० टक्के उद्योग बंद पडतात. उद्योजकाला स्वतःचा कॅश फ्लो मांडता आला पाहिजे. वैयक्तिक खर्च, स्थिरमत्ता संपादन केल्याने हाती पैसा राहत नाही. त्यामुळे कॅश फ्लोचे योग्य नियोजन करूनच खर्चाचे व गुंतवणुकीचे नियोजन केले पाहिजे. भांडवली जमेमुळे कॅश फ्लो वाढतो. कॅश फ्लो तयार करताना रोख उत्पन्न, देणेकऱ्यांकडून वसुली व व्याज व इतर उत्पन्न; कच्चा माल खरेदी, कामगार मजुरी, उत्पादन खर्च, परिवहन खर्च व मार्केटिंगचा खर्च, एकूण महसुली खर्च, निव्वळ रोख नफा, वजा होणारी स्थिर मालमत्ता प्राप्ती, भांडवली जमा व गुंतवणूक, निव्वळ भांडवली जावक, व्यवसायातील रोख मिळकत, मालकाने काढलेली रक्कम, वैयक्तिक खर्च, इत्यादींचा विचार करून निव्वळ शिल्लक रोख रक्कम म्हणजेच कॅश फ्लो आखता येतो. वैयक्तिक खर्च हा नेहमी रोख मिळकतीहून कमीच असला पाहिजे. कृषी उद्योग/व्यवसायाची ध्येय, ते कसे साध्य करता येईल याचा तर्क व मांडणी याचा विचार करून प्रकल्पाचा नियोजन आराखडा तयार करावा.

### (ड) निर्णय ठाम हवा....

कोणताही कृषी उद्योग सुरु करण्यापूर्वी मार्केटमध्ये काय स्कोप आहे, ग्राहकांची गरज काय हे लक्षात घेतले तर जास्त फायदा होतो. कृषी उद्योग सुरू करण्याआधी बारकाईने सर्वेक्षण, अभ्यास केला पाहिजे. ग्राहकांच्या व तुमच्या गरजेतून कृषी उद्योगांच्या नवनवीन संधी खुल्या होत जातात. शेतकऱ्यांचा फायदा डोळ्यांसमोर ठेवून काम केल्यास कृषी उद्योगात प्रचंड संधी आहेत. कोणताही कृषी उद्योग यशस्वी करणे हे “टीम वर्क” असते. कर्मचाऱ्यांना कामाचे समाधान मिळाले पाहिजे. निकष पाळले तरच ग्राहकांचा व पर्यायाने कंपनीचाही फायदा होतो. खरेदी-विक्री करतानाही नियम व अटींचे पालन केले पाहिजे. रक्कम चेक देणे, बिलिंग, कायदेशीर बाबी, शासकीय परवाने, उत्पादनाचे प्रमाणपत्रे, तपासणीचे रिपोर्ट इ. गोष्टींचे काटेकोर पालन केले पाहिजे.

### आत्मनिर्भर बळीराजा कृषी व्यवसाय प्रा. लि. पुणे विषयी:

सदरील कंपनी हि एक कृषी स्टार्टअप कंपनी आहे. ह्या कृषी स्टार्टअप कंपनीला भारत सरकारच्या विविध विभाग/मंत्रालय जसे कॉर्पोरेट कार्य मंत्रालय, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय ई. यांची संलग्नता व मान्यता आहे. कृषी स्टार्टअप कंपनीचे कॉर्पोरेट कार्यालय, पुणे येथे असून मराठवाडा विभागातील शेतकरी बांधवाकरीता जिंतूर, जि. परभणी येथे विभागीय कार्यालय सुरु केले आहे. कृषी स्टार्टअप कंपनी स्थापन करण्याचा मूळ उद्देश हा बळीराजा तथा शेतकरी बांधव व महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठे, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांचे “कृषी समन्वयक” म्हणून काम करणार आहे.

### जैविक बुरशीनाशके व जैविक खते उत्पादन युनिट:

आत्मनिर्भर बळीराजा कृषी स्टार्टअप कंपनीच्या जैविक बुरशीनाशके व जैविक खते उत्पादन युनिटचे उदघाटन डॉ. विलासजी भाले, कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या शुभ हस्ते करण्यात आले आहे. कृषी स्टार्टअप युनिटच्या माध्यमातून तयार होणारे जैविक बुरशीनाशके व जैविक खते ही रासायनिक खतांना पूरक तथा पर्यायी खते आहेत. या जैविक बुरशीनाशके व जैविक खतामुळे जमिनीची सुपीकता टिकुन राहते व उत्पादन खर्चात बचत होवून उत्पादन वाढीस मदत होते. विविध जैविक बुरशीनाशक उत्पादने जसे आत्मनिर्भर बायोमिक्स, आत्मनिर्भर ट्रायको, आत्मनिर्भर हरजा, आत्मनिर्भर वेरेन्स, आत्मनिर्भर मेटा (हुमणीनाशक), आत्मनिर्भर सुडो, आत्मनिर्भर बिव्हेरिया ई. तसेच जैविक खते यामध्ये आत्मनिर्भर एनपीके, आत्मनिर्भर रायझो, आत्मनिर्भर अझाटो, आत्मनिर्भर पिएसबी, आत्मनिर्भर सल्फर, आत्मनिर्भर झिंक इत्यादींचा विविध पिकांवर उत्पादन वाढ व समाधानकारक परिणाम झाल्याचे दिसून येते. येणाऱ्या काळात सर्वत्र शेतकरी बांधवांना उच्च दर्जा व गुणवत्ता असलेली जैविक उत्पादने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे डॉ. धर्मराजजी गोखले, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषी), डॉ. बाबासाहेबजी ठोंबरे, सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य, कृषी महाविद्यालय, अंबेजोगाई, जैविक खते शास्त्रज्ञ डॉ. सय्यद इस्माईल, सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य, कृषी महाविद्यालय, परभणी, कृषी विस्तारतज्ञ डॉ. राकेशजी अहिरे, सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य, कृषी महाविद्यालय, बदनापूर, सोयाबीन तज्ञ डॉ. शिवाजी म्हेत्रे, कृषी विस्तारतज्ञ डॉ. राजेशजी कदम, जैविक किटकशास्त्रज्ञ डॉ. पुरुषोत्तमजी झंवर, श्री. नामदेवजी वल्लमवाड, श्री. किशोरजी शेळके, मंडळ कृषी अधिकारी, जिंतूर तसेच कृषी बांधव व शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

(संपर्क: +९१ ९५९२८०४६०४)

★ ★ ★